यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479
परीक्षा विभाग / Examination Division

जावक क्र. पनिका/मार्च 2025/1700 दिनांक :03/04/2025

# परिपत्रक क्र. 08

## कृषि शिक्षणक्रमाच्या शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना Scan Copy / Revaluation करिता अर्ज भरण्याबाबत महत्वाच्या सूचना

1. मार्च 2025 मध्ये झालेल्या कृषी शिक्षणक्रमाच्या अंतिम सत्र परीक्षाचे निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या निकालाच्या आधारे विद्यार्थ्यांनी दिलेल्या परीक्षेतील संबंधित अभ्यासक्रमास प्राप्त गुणांबाबत पडताळणी करावयाची असल्यास विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार उत्तरपुस्तिकेबाबत खालील सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
2. विद्यापीठाच्या https://ycmou.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावरील होमपेजवर Student Corner या टॅबमधील मुद्दा क्र. 18, 19 मध्ये तसेच दिलेल्या लिंकवर (https://portal.ycmou.org.in/YCMRCRV/Content/StudentRV.aspx) उपलब्ध आहेत. विद्यार्थ्याने विहित मुदतीतच ऑनलाईन पध्दतीने Scan Copy / Revaluation याकरिता अर्ज करावयाचा आहे. अर्जासोबत आवश्यक असणारे शुल्क देखील ऑनलाईन पद्धतीनेच अदा करावयाचे आहे. **ऑनलाईन अर्जाची लिंक विद्यापीठ होमपेजवर उपलब्ध आहे**. याप्रक्रियेसाठी पुढीलप्रमाणे कालावधी व शुल्क निर्धारित केलेले आहे. **विहित मुदतीनंतर ऑनलाईन अर्ज सादर करता येणार नाही. ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. पोस्टाने अर्ज पाठवू नये. त्यावर विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**
3. स्कॅनकॉपी, पुर्नमूल्यांकन हे फक्त मार्च 2025 मध्ये झालेल्या अभ्यासक्रमांच्या उत्तरपुस्तिकांबाबतीतच होईल.
4. स्कॅनकॉपी / फोटोकॉपी (Scan copy / Photo copy of answer book) व पुर्नमूल्यांकन (Revaluation of answer book) फक्त तीन अभ्यासक्रमांचे (विषय) करता येईल. पुर्नमूल्यांकनासाठी (Revaluation of answer book) संबंधित अभ्यासक्रमाची स्कॅन कॉपी प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. पुर्नमूल्यांकन करण्यासाठी थेट पध्दतीने अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. (First apply for Scan copy / photo copy of answer book, then apply for revaluation within 02 days after receipt of scan copy/ photo copy. Without scan copy / Photo copy revaluation application is not accepted), (प्रथम स्कॅन कॉपीसाठी ऑनलाईन अर्ज करून, स्कॅन कॉपी प्राप्त झाल्यानंतर पुढील 02 दिवसाच्या आत Revaluation साठी अर्ज करावा.

5. स्कॅन कॉपी / फोटोकॉपीसाठी आपला ई-मेल आय डी अचूक लिहावा. आपण दिलेल्या चुकीच्या ई- मेलमुळे स्कॅन कॉपी / फोटोकॉपी आपणांस प्राप्त न झाल्यास, त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. (Please give correct Email ID, if incorrect mail ID given, then university will not be responsible for non-receipt of scan copy)

| **अ. क्र.** | **तपशील** | **प्रती विषय अभ्यासक्रम शुल्क रक्कम रू.** | **ऑनलाईन अर्ज सुरू होण्याचा दिनांक** | **ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची अंतिम दिनांक** |
|---|---|---|---|---|
| 1 | स्कॅन कॉपी/फोटो कॉपी (Scan copy/photo copy of answer book) (किमान 1, कमाल 3 विषय) | रू. 200/- | दि.05/04/2025 | दि.15/04/2025 |
| 2 | पुर्नमुल्यांकन (Revaluation of answer book) (किमान 1, कमाल 3 विषय) (प्रथमतः अनु.क्र.1 प्रमाणे स्कॅन कॉपी / फोटो कॉपी प्राप्त करून घेणे आवश्यक) | रु. 500/- | दि.05/04/2025 | दि.17/04/2025 |
| **स्कॅन कॉपी / फोटो कॉपी व पुर्नमुल्यांकन (Revaluation of answer book) अर्जांकरिता लिंक** **https://portal.ycmou.org.in/YCMRCRV/Content/StudentRV.aspx** | | | | |

विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन, पोस्टाने वा टपालाने गुणफेरमोजणी करण्यासाठी अर्ज पाठवू नये. असे अर्ज परीक्षा विभागास प्राप्त झाल्यास, त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY ज्ञानगंगा घरोघरी NASHIK-422 222.

**(भटूप्रसाद पाटील)**
**परीक्षा नियंत्रक**

**प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी**

1) विभागीय संचालक/ वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, य.च.म.मु. विद्यापीठाचे सर्व विभागीय केंद्रे यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कृषी अभ्यासकेंद्राच्या व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
2) केंद्रसंचालक / केंद्रप्रमुख, य.च.म.मु. विद्यापीठाचे सर्व कृषी अभ्यासकेंद्र
3) उपकुलसचिव परीक्षा कक्ष-1, परीक्षा कक्ष-2, परीक्षा कक्ष-3,
4) प्रमुख, संगणक केंद्र (परीक्षा)